# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक ०४/०४/२०२४ (गुरूवार) सकाळ**

---

## अवैधरीत्या देशी दारुची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक ०३/०४/२०२४ रोजी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग यांचे आदेशाने स्टाफ अवैध दारू विक्री व जुगार बाबतच्या रेड करणेकामी खाजगी वाहनाने पो.स्टे. खापा परिसरात फिरत असता मुखबीद्वारे विश्वसनीय खबर मिळाली की, खापा ते कोथुळणा रोडने एक ईसम हिरो स्प्लेंडर मोटरसायकलवर बाजुला एक थैलीमध्ये देशी दारू च्या निपा बांधुन वाहतुक करून घेवुन जात आहे. अशा मिळालेल्या माहितीवरून खापा ते पारशिवनी रोडवरील मौजा ढकारा फाटा येथे जावुन नाकाबंदी केली असता खापा कडुन एक ईसम स्प्लेंडर मोटरसायकल क्र. एम एच ४०/सी एफ २४८७ ला बांधुन असलेल्या थैलीमध्ये देशी दारू च्या निपा बांधुन वाहतुक करून घेवुन जातांना दिसुन आल्याने त्यास पोलीस स्टाफने थांबवुन त्याचे मोटरसायकलवर समोर ठेवलेल्या मुद्देमालाची पाहणी केली असता आरोपी नामे– दिलीप लखनसिंग टंडन वय ३९ वर्ष रा. किरणापुर दफई ता. सावनेर जि. नागपुर हा आपल्या वाहनात अवैधरीत्या विनापरवाना १) १८० एम एल संत्रा भिंगरी देशी दारू एकुण २४ सिलबंद निपा प्रत्येकी कि.७० रू प्रमाणे असा एकुण १६८० रू. २) ९० एम एल संत्रा भिंगरी देशी दारू एकुण ९६ सिलबंद निपा प्रत्येकी कि. ३५ रू प्रमाणे एकुण ३३६० रू. ३) हिरो सप्लेडर प्लस मोटर सायकल क्रं एम एच ४० सी एफ २४८७ किंमती ४०,००० रू असा एकुण किमती ४५०४०/– रू चा मुद्देमाल मिळुन आला. आरोपीविरूद्ध कलम कलम ६५(अ)(ई) महा.दा.का गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली मा. सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. अनिल म्हस्के, पोहवा अनिल मुंढे, सफौ. विकास बेलसरे, पोहवा शाम सोलंकी पोलीस अंमलदार नितेश पुसाम यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर